# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/६८/२०२५ दि. ०९/०४/२०२५

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रातील ठाणेनगर वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. १४/०४/२०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कोर्टनाका व ठाणे रेल्वे स्टेशन पश्चिम येथे मानवंदना कार्यक्रम होणार असुन कोर्टनाका ते ठाणे रेल्वे स्टेशन मार्गावर मिरवणुका निघणार असून त्याकरीता मोठया प्रमाणात अनुयायी उपस्थित राहणार आहेत. कोर्टनाका ते ठाणे रेल्वे स्टेशन मार्गावर मिरवणुकांमुळे गर्दी होणार आहे. सदर ठिकाणची वाहतुक सुरळीत व सुरक्षीत रहावी, वाहतुकीची कोंडी होवु नये, या करीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद** – १) जी.पी.ओ. कडुन कोर्ट नाका मार्गे ठाणे रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना जी.पी.ओ. येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने जी.पी.ओ येथुन डावीकडे वळण घेवून सेंट्रल मैदान रोडने ठाणे कारागृह मार्गे क्रिक नाका येथुन दादोजी कोंडदेव स्टेडीयम कडुन अे वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – २) कळवा, क्रिक नाका कडुन उर्जिता हॉटेल मार्गे कोर्टनाकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना उर्जिता हॉटेल येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने उर्जिता हॉटेल येथून उजवे वळण घेवून मध्यवर्ती कारागृह समोरून जी.पी.ओ. मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – ३) ठाणे रेल्वे स्टेशन कडून टॉवरनाका/ टेंभीनाकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस व एस.टी.बसेस तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहने यांना **मुस चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने ठाणे रेल्वे स्टेशन येथुन सॅटिस ब्रिज वरून येणाऱ्या परिवहनच्या सर्व एस टी बसेस तसेच टी.एम.टी. बसेस बी.कॅबीन सॅटिस ब्रिजवरून गोखले रोड, हरिनिवास मार्गे इच्छीत स्थळी जातील. तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहने सॅटिस ब्रिज खालून स्टेशन रोड मुस चौक मार्गे डावीकडे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील.

**पार्किंग मनाई** – कोर्टनाका ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जांभळी नाका, शिवाजी पथ, अग्यारी लेन, मुस चौक ते पंजाब अलोक हॉटेल, मासुंदा तलाव परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दि. १४/०४/२०२५ रोजी सायंकाळी १८:०० वा. ते रात्रौ २४:०० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner